# पुणे मेट्रो : रेल्वे रूळ टाकण्यास लवकरच सुरवात



रेल्वे रूळ हे कुठल्याही रेल्वे प्रणालीचे अभिन्न अंग आहे. रेल्वे रुळामुळेच  भूपृष्ठ परिवहन प्रकारात रेल्वे वैशिट्य पूर्ण ठरते . पुणे मेट्रो रेल्वे प्रणाली देखील यास अपवाद नाही. पुणेकरांना लवकरात लवकर मेट्रो रेल्वे सुरु करण्यासाठी महामेट्रोने नियोजन केले आहे  आणि त्याचाच एक भाग म्हणून रेल्वे रूळ टाकण्याचे काम लवकरच सुरु होणार आहे . वेळेची बचत व्हावी त्यामुळे नागपूर इथे असलेले अतिरिक्त रेल्वे रूळ पुणे मेट्रो प्रकल्पासाठी मागविण्यात येत आहेत . पुणे मेट्रोचा ४.५ किमी उन्नत मार्ग सध्या पूर्ण झालेला असून तेथे हे रूळ टाकण्याचे काम करण्यात येणार आहे.

पुणे मेट्रो UIC ६० E १, १०८० ग्रेड, हेड हार्डन याप्रकारचे रेल्वे रूळ वापरणार आहे. जगभरातल्या अत्याधुनिक रेल्वे प्रणाली याच प्रकारचे रेल्वे रूळ वापरत आहे. महामेट्रोसाठी रेल्वे रूळ १८ मी व २५ मी या लांबीमध्ये वापरण्यात येणार आहे . हे रेल्वे रूळ अत्याधुनिक फ्लॅश बट व अल्युमिना थर्मिट वेल्डिंग तंत्रज्ञानाद्वारे एकमेकांना जोडण्यात येणार आहे . अश्या जोडलेल्या रेल्वे रुळांचे अत्याधुनिक अल्ट्रा सॉनिक मशीनद्वारे टेस्टिंग केले जाणार आहे. या रेलचा वरचा भाग (हेड) हा विशिष्ट तंत्रज्ञानाद्वारे कठीण (हार्ड) केलेला असेल त्यामुळे या रुळाची झीज कमी होईल व त्यामुळे रुळांचे आयुष्य वाढेल व रूळ बदलण्याची लवकर लवकर आवश्यकता पडणार नाही .

पुणे मेट्रो प्रकल्पासाठी एकूण ९००० M T रुळांची आवश्यकता आहे . रिच १ व रिच २ प्रायारीटी सेक्शन साठी एकूण ३००० M T रूळ लागणार आहेत . नागपूरहून ६०० M T रूळ पुण्यासाठी सध्या येणार आहेत. हे रूळ इस्ट मेटल A G या स्वित्झर्लंडच्या कंपनीने त्यांच्या सायबेरियातील कारखान्यात बनविले आहेत.

पुणे मेट्रोचा उन्नत व भूमिगत मार्गाचा ट्रॅक हा बॅलास्ट लेस या प्रकारातला असणार आहे . सामान्यतः रेल्वे प्रणालीत रेल्वे रूळ दगडाच्या खडीवर ( बॅलास्ट) टाकण्यात येतात . जेणेकरून रेल्वे रुळावरून कोच जाताना रेल्वे रूळ खाली दाबले जाऊन कुशन सारखा परिणाम साधता येतो. बॅलास्ट सहित (Ballasted) रुळांचे अनेक तोटे असल्यामुळे पुणे मेट्रो मध्ये बॅलास्ट विरहीत (Ballastless) रूळ टाकण्यात येणार आहे. यामुळे प्रवाशांना आरामदायक (कम्फर्ट) मध्ये वाढ होणार आहे. अशाप्रकारचा बॅलास्ट विरहीत ट्रॅकचे इतरही अनेक फायदे आहेत .

१) कमीत कमी देखभालीची गरज

२) पर्यावरणास अनुकूल

३) प्रदूषण मुक्त

४) रायडींग कम्फर्ट चांगला

५) रेल्वे रुळांची आयुष्य वाढवण्यासाठी मदतगार

पुणे मेट्रो प्रकल्प नियोजित वेळेनुसार सुरु करण्यासाठी संपूर्ण नियोजन झाले असून त्याचाच एक हिस्सा म्हणून रेल्वे रूळ नागपूरहून मागविण्यात येत आहेत. हे रूळ घेऊन येणारे ट्रक नागपूरहून निघाले असून लवकरच पुण्याला पोहोचणार आहेत. रेल्वे रूळ पुण्यात पोहोचल्यावर लगेचच रूळ टाकण्याचे काम हाती घेण्यात येणार आहे.